नवराष्ट्र

# दुर्गम भागातील रुग्णांसाठी रुग्णवाहिका

**पुणे**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. क्विक हील फाउंडेशन, क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने वाशिममधील अधिकाऱ्यांना दोन अत्याधुनिक वाहने 'आरोग्य यान' सुपूर्द केली. हा दानाचा समारंभ क्विक हील फाउंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर, वाशिमचे जिल्हाधिकारी शण्मुगराजन एस, वाशिमचे जिल्हा परिषद सीईओ वासुमना पंत, असिस्टंट कलेक्टर कुलदीप जंगम आणि क्विक हील फाउंडेशनचे सीएसआर मॅनेजर अजय शिर्के यांच्या उपस्थितीत झाला. या उपक्रमासह, क्विक हील फाउंडेशनने मनोरा व रिसोड तालुक्यातील १ लखाहून अधिक लोकांसाठी आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करून त्याचे सकारात्मक परिणाम साधण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे.



काटकर म्हणाल्या, " क्विक हील फाउंडेशन भारताच्या ग्रामीण भागात अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे. वाशिम येथील जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही अधिकाऱ्यांचे आभार मानू इच्छितो. ' आरोग्य यान' उपक्रमाद्वारे या भागातील लोकांच्या आरोग्य सेवाविषयक गरजा दीर्घ काळ पूर्ण करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.

Pune Plus Edition
14 August 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com